# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ११८-२३** **दिनांक :- ११/०४/२०२३**

## मोटर सायकल चोरी करणाऱ्या आरोपीतांस अटक करुन ४ गुन्हयांची उकल
## नवघर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

नवघर पोलीस ठाणे हद्दीतील फिर्यादी नामे श्री. शामलाल बैजनाथ गुप्ता, रा. रुम. नं ११० सन्नी महल, नवघर रोड, भाईदर पुर्व ता.जि.ठाणे यांनी त्यांची होंडा ॲक्टीव्हा मोटार सायकल क्र. MH-04 FM-9707 हि दिनांक ०६/०४/२०२३ रोजी रात्री ०९.०० वा साई आराधना बिल्डींग समोर, जैसल पार्क, भाईदर पुर्व येथे पार्क केली होती. दिनांक ०७/०४/२०२३ रोजी सकाळी ०९.०० वा. फिर्यादी हे त्यांनी पार्क करुन ठेवलेली मोटार सायकल घेण्यासाठी घटनास्थळावर गेले असता त्यांची मोटार सायकल त्यांनी पार्क केलेल्या ठिकाणी मिळुन आली नाही. त्यावेळी त्यांनी मोटार सायकलचा आजुबाजुच्या परिसरात शोध घेतला परंतु ती मिळुन न आल्याने सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीताविरुध्द नवघर पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. ा २५१/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९, ३४ अन्वये दाखल करण्यात आला होता.

नवघर पोलीस ठाणे हददीत वारंवार मोटार सायकल चोरीचे गुन्हे घडत असल्याने वरिष्ठांनी गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सुचना व मार्गदर्शन केले होते. त्या अनुषंगाने नवघर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदारा व तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे आरोपी नामे १) शुभम निरज सिंग, वय-२५ वर्षे, रा. निरज निवास, जय भवानी नगर, धारखाडी, गॅस गोडावुन, दहिसर पुर्व मुंबई, २) ओम विक्रम सोळंकी, वय-१९ वर्षे, रा. डी/०२, ००६ साई राज्य बिल्डींग, शिर्डी नगर, भाईंदर पुर्व ता.जि.ठाणे यांना ताब्यात घेवनु तपास केला असता त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना दिनांक ०८/०४/२०२३ रोजी अटक करण्यात आले. वर नमुद अटक आरोपीतांकडे अधिक तपास केला असता त्यांनी चोरी केलेल्या ०४ व गुन्हे करतांना वापरलेले ०१ अशा एकुण ०५ मोटार सायकल ०१,५०,०००/- रुपये किंमतीच्या हस्तगत करण्यात आल्या आहेत व ४ गुन्हे उघडकीस आले आहेत.

### -:उघडकीस आलेले गुन्हे:-

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.क्र. व कलम |
|---|---|---|
| १ | नवघर पोलीस ठाणे | गु.र.क्र २५१/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९,३४ |
| २ | नवघर पोलीस ठाणे | गु.र.क्र-२५३/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९, ३४ |
| ३ | नवघर पोलीस ठाणे | गु.र.क्र-२४९/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९, ३४ |
| ४ | नायगाव पोलीस ठाणे | गु.र.क्र-३९/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९, ३४ |

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. शशीकांत भोसले, सहायक पोलीस आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री. विजय पवार, पो.नि. श्री. सुशिलकुमार शिंदे, स.पो.नि. योगेश काळे, पो.उप.नि. अभिजित लांडे, पो.हवा. भुषण पाटील, सुरेश चव्हाण, नवनाथ घुगे, जयप्रकाश जाधव, पो.अंम. ओंकार यादव, सुरजसिंग घुनावत, विनोद जाधव यांनी केलेली आहे.